# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** लाखनी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0053 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**10/02/2026 21:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 10/02/2026

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 10/02/2026

**Time From (वेळेपासून):** 12:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 10/02/2026 **Time (वेळ):** 16:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 053

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 10/02/2026 21:35 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सिंधी लाईन लाखनी ,लाखनी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

फिर्याद

पोलीस स्टेशन लाखणी
दिनांक १०/०२/२०२६

मी श्री. नितेश कुशाबराव देशमुख, वय ४१ वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा, मो. न. ७५८८२४४२६८ सरकार तर्फे फिर्यादी होवून लेखी फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे माहे जून-२०२५ पासून पोलीस निरीक्षक पदावर नेमणुकीस आहे.

दिनांक ०३/०२/२०२६ रोजी आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर असतांना पोलीस उपअधीक्षक, श्री. अरूणकुमार लोहार यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार श्री. शंकर देवराव सावरकर, वय ५० वर्ष, व्यवसाय- मजुरी, रा. वार्ड क्र. ६, गभनी मोहल्ला, लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा यांची ओळख करून दिली व त्यांची लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याचे सांगितल्याने, आम्ही तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीबाबत तोंडी विचारपूस करून त्यांना त्यांची तक्रार लिहूण देण्याकरीता पेन व कोरे कागद उपलब्ध करून दिले असता, त्यांनी आपणच तोंडी तक्रार लिहावी. अशी विनंती केली. त्यावरून तक्रारदार यांचे सांगणे प्रमाणे तोंडी रिपोर्ट संगणकावर टाईप करून घेतली ती खालील प्रमाणे.

"तोंडी तक्रार:- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा दिनांक:- ०३/०२/२०२६ चे १४.५५ वा. नाव- श्री. शंकर देवराव सावरकर, वय ५० वर्षे, रा. वार्ड क्रमांक ०६, गभनी मोहल्ला, लाखनी, तालुका- लाखनी, जिल्हा- भंडारा, व्यवसाय- मजुरी, मो.क्र.९३७३६६४१२९. मी आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो भंडारा येथे येवुन तोंडी रिपोर्ट देतो की, वर नमुद पत्त्यावर राहतो व मजुरीचे काम करतो. मला मुलगा तेजस सावरकर, वय २० वर्षे व मुलगी कु. तेजस्विनी सावरकर, वय २० वर्षे असे असून ते दोघेही जुडवा आहेत. मी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ येथून नोंदणीकृत कामगार आहे. नोंदणीकृत कामगार यांचे मुलांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कडून शिष्यवृत्ती मिळत असते. माझा मुलगा तेजस सावरकर व मुलगी कु. तेजस्विनी सावरकर हे सन २०२०-२१ मध्ये ईयत्ता १० वा वर्ग पास झाल्यानंतर श्री. सतिश मोटघरे, रा. लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा यांचे लाखणी येथील न्यु नेहा सेतु सेवा केंद्र येथून त्यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कडून शिष्यवृत्ती मिळणे करीता ऑनलाईन अर्ज भरलेला होता. त्यावेळी श्री.सतिश मोटघरे यांनी मला सांगितले कि, माझी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील साहेबांशी ओळखी असून मी, तुमच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळवून देतो असे म्हणुन माझा मुलगा व मुलगी यांचे शैक्षणीक डॉक्युमेंट व माझे कामगार नोंदणीचे डॉक्युमेंट असे ओरीजनल डॉक्युमेंट हे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथे जमा करावे लागतात. असे सांगून ठेवून घेतले होते. त्यानंतर मुलगा तेजस व मुलगी कु. तेजस्विनी यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कडून प्रत्येकी २५,०००/-रू शिष्यवृत्ती मिळाली होती. त्यानंतर मी वारंवार श्री. सतिश मोटघरे यांचेकडे माझ्या मुलांचे व माझे मुळ डॉक्युमेंट मागण्याकरीता गेलो असता, ते डॉक्युमेंट देण्यास टाळाटाळ करीत होते. मी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी श्री. सतिश मोटघरे, रा. लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा यांचे लाखणी येथील न्यु नेहा सेतु सेवा केंद्र येथे गेलो व मुलगा तेजस, मुलगी कु. तेजस्विनी आणि माझे ओरीजनल डॉक्युमेंटची मागणी केली असता, गैरअर्जदार श्री. सतिश मोटघरे यांनी मला, 'तुमच्या मुलांचे शिष्यवृत्तीचे काम मी करून दिले असून ओरीजनल डॉक्युमेंट सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथे जमा असून, तुमचे ओरीजनल डॉक्युमेंट परत देण्याकरीता व मुलांच्या शिष्यवृत्तीचे काम करून दिले असल्याने सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय भंडारा येथील साहेबा करीता व स्वत: करीता १२,०००/- रूपये लाचेची मागणी केली आहे. मी गैरअर्जदार श्री. सतिश मोटघरे यांना सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील कोणत्या साहेबाकडे माझे काम आहे. याबाबत विचारणा केली असता, त्यांनी नाव सांगण्यास टाळाटाळ केली आहे. तरी, मुलगा तेजस सावरकर व मुलगी कु. तेजस्विनी सावरकर यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कडून शिष्यवृत्ती मिळणे करीता गैरअर्जदार श्री. सतिश मोटघरे यांनी ओरीजनल डॉक्युमेंट ताब्यात घेतले असून ते डॉक्युमेंट सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथे जमा असल्याचे सांगूण ते परत देण्याकरीता व शिष्यवृत्तीचे



NK १०/२/२६
(नितेश कु देशमुख)

Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नितेश कुशाबराव देशमुख

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, ,भंडारा ,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, ,भंडारा ,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7588244268

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सतिश तुळषिराम मोटघरे | | | 1. लाखोरी रोड लाखनी ,लाखनी , लाखनी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

पो स्टे ला तक्रार प्राप्त होताच

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | एक वन प्लस कंपनीचा मोबाईल फोन | 10,000.00 |



Scanned with OKEN Scanner

काम करून दिले. याकरीता सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील साहेब व स्वत: करीता १२,०००/- रूपये लाच मागत असुन त्यांना लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. गैरअर्जदार यांचेशी माझे पुर्वीचे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. मी घरच्या कामात व्यस्त असल्याने आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो भंडारा येथे येवून गैरअर्जदार यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही होण्याकरीता तोंडी तक्रार देत आहे. मी कार्यवाही संबंधाने माझे १) BOCW Profile Latter २) जन आरोग्य सेवा रजिस्ट्रेशन कार्ड ३) आधार कार्ड, असे झेरॉक्स कागदपत्रे सादर करीत आहे. हिच माझी तोंडी तक्रार आहे. माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टाईप केली त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली. माझे सांगणेप्रमाणे बरोबर टाईप केले आहे. सही मराठीत शंकर सावरकर''

अशी तोंडी रिपोर्ट दिली होती. त्यावरुन आम्ही गैरअर्जदार यांचे विरुध्द सापळा आजमाविण्याचा निर्णय घेतला. या कार्यालयाचे जा.क्र. १३१/२०२६ दि. ०३/०२/२०२६ प्रमाणे मा. अधिक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ भंडारा यांना दोन पंच मिळणे करीता पत्र दिले असता, त्यांनी १) श्री. निखील लेहनदास रामटेके, वय २९ वर्षे, पद-संगणक, कार्यालय अधिक्षक अभियंता, भंडारा सिंचन मंडळ भंडारा, रा. गिरोला, ता.+जि. भंडारा असे एकच पंच पुरविले. त्यावरुन पुन्हा एक पंच मिळणे करीता या कार्यालयाचे जा.क्र. १३२/२०२६ दि. ०३/०२/२०२६ प्रमाणे मा. वनपरीक्षेत्र अधिकारी, भंडारा यांना पत्र दिले असता, त्यांनी २) श्री. हरीचंद बळीराम कापगते, वय ५८ वर्षे, पद-वनमजूर, वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय, भंडारा यांना पुरविले. दोन्ही पंच प्रत्यक्ष हजर झाल्यानंतर आमचे सुचनेवरून तक्रारदार यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांची तक्रार तोंडी कथन केली. त्यानंतर तक्रारदार यांनी दिलेली तोंडी रिपोर्ट दोन्ही पंचाना वाचण्यास दिली. त्यावेळी ती त्यांनी वाचून पाहिली असता, तक्रारदार यांनी तोंडी कथन केलेली व तोंडी रिपोर्ट एकच असल्याची खात्री झाल्याने तोंडी रिपोर्ट व कार्यवाही संबंधाने सादर केलेल्या कागदपत्रावर आम्ही व दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. शंकर सावरकर यांना गैरअर्जदार श्री. सतिश मोटघरे, रा. लाखणी हे आपल्याला कधी व कुठे भेटतील? या बाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगितले कि, गैरअर्जदार हे त्यांचे लाखणी येथील न्यु नेहा सेतु सेवा केंद्र येथे सकाळी १०.०० वा. ते सायंकाळी ०६.०० वा. चे दरम्यान भेटतात. ज्यावेळी मी त्यांचेकडे माझ्या मुलांचे व माझे स्वत:चे डॉक्युमेंट मागण्याकरीता जाईन त्यावेळी गैरअर्जदार हे मला पैश्याची मागणी करण्याची शक्यता आहे. असे दोन्ही पंचासमक्ष सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी कळविले कि, आपण आता गैरअर्जदार श्री. सतिश मोटघरे त्यांचेकडे पडताळणी कार्यवाही करीता जात पर्यत ते त्यांची सेतु सेवा केंद्र बंद करण्याची शक्यता असल्याने पुढील पडताळणी कार्यवाही दिनांक ०४/०२/२०२६ रोजी आयोजीत करावी. अशी विनंती केली व मी आपणास कार्यवाही संबंधाने मौजा लाखणी येथील डॉ. दिपराज ईलमकर यांचे दवाखाण्याचे समोरील खुल्या आवारात भेटतो. असे सांगितले. त्यावरुन पुढील पडताळणी कार्यवाही दिनांक ०४/०२/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दिनांक ०४/०२/२०२६ रोजी आम्ही, दोन्ही पंच आणि सापळा कार्यवाहीतील सदस्य असे ठरविलेल्या वेळेत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर आलो. पडताळणी कार्यवाही करिता शासकीय चारचाकी वाहण वापरण्याचे ठरवून वाहनात पडताळणी/सापळा कार्यवाही संबंधाने साहीत्य व कागदपत्रे ठेवून पडताळणी/सापळा कार्यवाही करणे करिता आम्ही, दोन्ही पंच व कार्यवाहीतील सदस्यासह शासकीय चारचाकी वाहनाने रवाना होवून वेळ १२:०४ वाजता डॉ. दिपराज ईलमकर यांचे दवाखाण्याचे समोरील खुल्या आवारात मौजा लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा येथे पोहचलो. तिथे आम्हास तक्रारदार उपस्थित दिसून आले. पुढील पडताळणी कार्यवाही त्याच ठिकाणावरून आयोजित करण्याचे ठरवून पडताळणी कार्यवाही करिता तक्रारदार आणि पंच क्रमांक १ यांना गैरअर्जदार यांचे न्यु नेहा सेतु सेवा केंद्र लाखणी येथे व्हॉईस रेकॉर्डर पंच क्रमांक १ यांचे आवाजात रेकॉर्डीग मोडवर सुरु करुन पाठविण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर तक्रारदार आणि दोन्ही पंचांना पडताळणी कार्यवाही संबंधाने सविस्तर माहिती देवून त्यात वापरण्यात येणारे व्हॉईस रेकॉर्डर आणि मेमरी कार्डचा वापर कशा प्रकारे करण्यात येतो याबाबत सांगून कार्यालतील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर दाखविले. त्यानंतर KDM कंपनीचा 32GB MEMORY CARD काढुन मेमरी कार्ड वरील क्रमांक पंचाकडुन खात्री करुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सेल टाकुन डेट आणि टाईम सेट करुन मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकण्यात आले. व्हॉईस रेकॉर्डर पंच क्र. १ श्री. निखील रामटेके यांचे



10/2/26
(नितेश ॐ देशमुख)
पो. नि. ACB भंडारा

Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | सि.डी. प्लेअर | 32 जी बी चे दोन मेमोरी कार्ड | 0.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | शैक्षणिक प्रमाणपत्र | तक्रारदार यांचे व त्यांचे मुलांचे शैक्षणीक कागदपत्रे झेराक्स प्रती. | 0.00 |
| 4 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | आरोपी यांचे एस.बि.आय. ग्राहक सेवा केंद्र चालविण्याचे कागदपत्रांच्या झेरॉक्स | 0.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 11,000/ रुपये (500 रु. चे 22 नोटा) | 11,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

21,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

कायमी अपराध क्रमांक - 53 /2026 कलम 7,7(अ) भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम सन 1988 (सुधारणा 2018)
फिंयादी:- श्री. नितेश कुशाबराव देशमुख, वय 41 वर्ष, व्यवसाय- नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, नेमणुक- लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, भंडारा, मो. न. 7588244268
आरोपी:- इतर लोकसेवक श्री. सतिश तुळषिराम मोटघरे, वय 28 वर्शे, ह.मु. लाखोरी रोड, लाखणी, ता.लाखणी, जि. भंडारा, मुळ पत्ताः- पोहरा, ता. लाखणी, जि. भंडारा, काम- न्यु नेहा सेतु सेवा केंद्र मालक तसेच ग्राहक सेवा केंद्र चालक.
घटनास्थळ:- न्यु नेहा सेतु सेवा केंद्र, सिंदी लाईन चैक लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा.
घटना ता. वेळ:- दिंनाक 10/02/2026 चे 12/15 वा.
मागणी केलेली लाच:- 12,000/- रुपये.
स्विकारलेली लाच रक्कम:- 11,000/-रुपये
जप्त केलेला मुद्देमाल:-
1) एकुण 11,000/- रुपये ज्यात 500/- रूपये दराच्या 22 चलनी नोटा.
2) आरोपी सतिष मोटघरे यांचा एक वन प्लस कंपनीचा मोबाईल फोन किंमत अंदाजे 10,000/- रु
3) दोन 32 जी.बी.मेमरी कार्ड.
4) तक्रारदार यांचे व त्यांचे मुलांचे शैक्षणीक कागदपत्रे झेरा◌ॅक्स प्रती.
5) आरोपी यांचे एस.बि.आय. ग्राहक सेवा केंद्र ; चालविण्याचे कागदपत्रांच्या झेराँक्स

प्रकरण अषा प्रकारे आहे कि, यातील तक्रारदार श्री. शंकर देवराव सावरकर, वय 50 वर्शे, रा. लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा हे नोंदणीकृत कामगार असून, त्यांचे मुलांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ येथून शिष्यवृत्ती मिळणे करीता ईतर लोकसेवक श्री. सतिष तुळषिराम मोटघरे, वय 28 वर्षे ह. मु. लाखोरी रोड, लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा, मुळ पत्ताः- पोहरा, ता. लाखणी, जि. भंडारा यांचे न्यु नेहा सेतु सेवा केंद्र लाखणी येथून ऑनलाईन फार्म भरणा केले असून त्यावेळी आरोपी यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे मुलांचे शैक्षणीक ओरीजनल डा◌ॅक्युमेंट सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथे जमा करावे लागतात असा



Scanned with OKEN Scanner

आवाजात रेकॉर्डीग मोडवर वेळ १२:२७ वाजता सुरु करुन ते तक्रारदार यांचे गळयात घालुन तक्रारदार आणि पंच क्रमांक 1 यांना गैरअर्जदार यांना भेटण्याकरीता करिता पायी १२:३० वाजता रवाना केले होते. वेळ १२:४६ वाजता तक्रारदार व पंच क्रमांक ०१ हे आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी परत आले. आम्ही तक्रारदार श्री. शंकर सावरकर यांचे गळयातुन व्हाईस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्रमांक 1 यांचे आवाजात व्हाईस रेकॉर्डीग १२.४८ वा. बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये असलेल्या मेमरी कार्ड मधील FOLDER-1 मध्ये फाईल क्रमांक 260204_1226 ही फाईल रेकॉर्ड झाली असल्याची दिसुन आली. त्यानंतर आम्ही पंच क्रमांक ०१ श्री. निखील रामटेके यांचे कडुन पडताळणी कार्यवाही दरम्यान घडलेली हकिकत कथन करण्यास सांगितले असता, त्यांनी हकिकत कथन केल्यानंतर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान व्हाईस रेकार्ड मध्ये रेकार्ड झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, पंच क. 1 यांनी सांगितलेली हकिकत व तक्रारदार यांनी दिलेल्या दुजोऱ्या वरून व रेकार्डर मधील संभाषणावरून "तक्रारदार हे गैरअर्जदार यांचेकडे गेल्यावर त्यांनी त्यांचे कामासंबंधाने बोलणी केली असता, गैरअर्जदार यांनी १२,०००/- रुपये मागणी केली. त्यावरुन तक्रारदार यांनी साहेबांना काही पैसे कमी कराला लावा असे बोलले असता, गैरअर्जदार यांनी त्यांचे मोबाईलवरुन कोणालातरी फोन केला व त्यांना तक्रारदार त्यांचेकडे त्यांचे डॉक्युमेंट संबंधाने आले असल्याचे सांगितले व मोबाईलवर बोलत असलेल्या व्यक्तीसोबत संभाषणातून समन्वय साधून १२,०००/- रुपये लाचेची मागणी करून तडजोड अंती ११,०००/- रुपये स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे दिसुन आले. परंतु तक्रारदार यांनी गैरअर्जदार श्री. सतिश मोटघरे यांना ते मोबाईलवर बोलत असलेल्या व्यक्तीचे नाव विचारणा केली असता, त्यांनी नाव सांगितले नसल्याचे दिसून आले आहे.

त्यानंतर तक्रारदार यांनी पंचासमक्ष आम्हास कळविले कि, त्यांचे मुलीला मुलगा पाहण्याकरीता येणार असल्याने मुलीचा लग्न जोडण्याचे कार्यात व्यस्त राहणार असून मी मोकळा होताच आपणास कळवितो. असे सांगितले वरुन तक्रारदार यांना सापळा कार्यवाही करीता गैरअर्जदार यांनी मागणी केलेल्या पैशाची व्यवस्था करून तसेच त्यांचे मुलीचे लग्न जोडण्याचे काम आटोपताच लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर येणेबाबत सांगुण त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल अशा सुचना देवून तक्रारदार यांना मोकळे करण्यात आले होते. तसेच आम्ही लाप्रवि. भंडारा येथे परत जावुन व्हॉईस रेकॉर्डर द्वारे मेमरी कार्ड मध्ये पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार आणि गैरअर्जदार यांचे रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकुण संभाषणाची स्क्रिप्ट काढुन व संभाषणाची फाईलची हॅश व्हॅल्यू काढुन तसेच मेमरी कार्ड वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करुन त्यावर आम्ही, दोन्ही पंचानी सही केल्या. कार्यवाहीचा पंचनामा तयार करुन त्यात सविस्तर नोंदी घेण्यात आले आहेत. पुढील सापळा कार्यवाही ही तक्रारदार हे त्यांचे घरगुती कामातुन मोकळे होताच तसेच त्यांचे कडून लाच रकमेची व्यवस्था झाल्यानंतर करण्याचे ठरविण्यात आले होते.

आज दिनांक १०/०२/२०२६ रोजी सकाळी ०८.१३ वा. तक्रारदार यांनी आमचे मोबाईलवर फोन करून माझे घरगुती काम आटपले असून गैरअर्जदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम घेवून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे येत असल्याची माहीती दिली. त्यावरुन आम्ही दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्य यांना फोन करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर येण्याचे सुचना दिले. तक्रारदार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे हजर आल्यानंतर त्यांनी गैरअर्जदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देता यावी. याकरीता त्यांनी नातेवाईकांकडून हातउसने घेतले असलेले ११,०००/- रुपये रक्कम (ज्यात ५००/- रुपये दराच्या २२ भारतीय चलनी नोटा) पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर नोटांचे क्रमांक आम्ही लॅपटॉपवर टाईप करुन त्यांची प्रिंट काढली दोन्ही पंच यांचे कडुन नोटावरील नंबर व टाईप केलेले नंबर पडताळणी करुन तक्रारदार आणि दोन्ही पंच यांना नोटांवर लावण्यात येणारे ॲन्थ्रासिन पावडर व अल्ट्रावायलेट टार्च संबंधाने सविस्तर माहिती देवून नोटांवर ॲन्थ्रासिन पावडर लावून अल्ट्रावायलेट टार्चचा प्रकाश टाकुन प्रात्यक्षीक करण्यात आले व ते नोटा लिफाफ्यात ठेवून लिफाफा सापळा बॅग मध्ये सुरक्षीत ठेवण्यात आला. त्यानंतर तक्रारदार यांनी सापळा कार्यवाही आजच आयोजित करावी. अशी विनंती केल्याने सापळा कार्यवाही करिता लागणारे सर्व साहीत्य व कागदपत्रे शासकीय चारचाकी वाहण व एका खाजगी चारचाकी वाहणात ठेवून त्या वाहणाने आम्ही, पोलीस उपअधिक्षक डॉ. अरूणकुमार लोहार सर, तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा कार्यवाहीतील सदस्य असे डॉ. दिपराज ईलमकर यांचे दवाखाण्याचे समोरील खुल्या आवारात मौजा लाखणी



NK
10/2/26
(नितेश कु देशमुख)

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

बनाव करून स्वतःकडे ठेवून ते डा्ॅक्युमेंट परत देण्याकरीता तसेच शिश्यवृत्तीचे काम करून दिल्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांना सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील साहेब ओळखीचे असल्याचा प्रभाव पाडून 12,000/- रुपये रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती 11,000/- रुपये लाच रक्कम सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे कडून स्विकारल्याने सरकार तर्फे फिंयादी पोलीस निरीक्षक श्री. नितेष देषमुख, लाप्रवि. भंडारा यांचे फिंयादवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Subhash Kishanrao Barse(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

NK 10/2/26

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

11/02/2026 चे 11.00 वा.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Subhash Kishanrao I

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन
साखनी



Scanned with OKEN Scanner

येथे जाण्यास वेळ ११:२१ वाजता रवाना होवून ११:५५ वा. पोहचलो. आम्ही तक्रारदार दोन्ही पंच आणि कार्यवाहीतील सदस्यांना सापळा कार्यवाही संबंधाने त्यांची भुमीका समजावुन देवून सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्ड सुरु करुन त्यात नवीन 32GB SanDisk Micro SDHC card काढुन मेमरी कार्ड वरील क्रमांक पंचाकडुन खात्री करुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये डेट आणि टाईम सेट करुन मेमरी कार्ड व्हॉईस रेकॉर्डर मध्ये टाकण्यात आले. पंच क्रमांक २ यांचे हस्ते तक्रारदार यांची अंगझडती घेवून त्यांचे फुलपॅन्टचे उजव्या बाजुचे समोरील खिशात सापळा बॅग मध्ये असलेले लाच रक्कमेचे लिफाफ्यातील ५००/- रुपये दराचे २२ नोटा ठेवून घेतल्या. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर वेळ १२:०७ वाजता पंच क्रमांक १ यांचे आवाजात रेकॉर्डींग मोडवर सुरु करुन तक्रारदार आणि पंच श्री. निखील रामटेके यांना सोबत पायी गैरअर्जदार यांचे न्यु नेहा सेतु सेवा केंद्र येथे वेळ १२.०८ वा. रवाना करुन आम्ही तसेच सापळा कार्यवाहीतील सदस्य व पंच क्रमांक २ असे पायी तक्रारदार यांचे मागोमाग रवाना झालो व गैरअर्जदार यांचे न्यु नेहा सेतु सेवा केंद्राचे बाहेर आपले अस्तित्व लपवून तक्रारदार यांचे ईशाऱ्याची वाट पाहत असतांना वेळ १२:१५ वाजता तक्रारदार यांनी गैरअर्जदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा दिल्याने आम्ही सर्व स्टाफ न्यु नेहा सेतु सेवा केंद्र येथे गेलो. पंच क्रमांक १ यांना लाच रक्कम कुणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी आम्हास पांढऱ्या रंगाचा ज्यावर काळे रंगाचे पट्टे असलेला हाफ शर्ट घातलेल्या व्यक्ती कडे बोट दाखवून त्यांनी पैसे स्विकारल्याचे सांगितल्याने सापळा कार्यवाहीतील सदस्याचे हस्ते गैरअर्जदार यास ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांना जवळ बोलावून घेवून त्यांचे गळयातुन व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढून आरोपीला आपली ओळख सांगून त्यांचे नाव, गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सतिश तुळशिराम मोटघरे, वय २८ वर्षे, ह.मु. लाखोरी रोड, लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा, मुळ पत्ता:- पोहरा, ता. लाखणी, जि. भंडारा, काम- न्यु नेहा सेतु सेवा केंद्र मालक तसेच ग्राहक सेवा केंद्र चालक असे सांगितले. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डीग पंच श्री. निखील रामटेक यांचे आवाजात बंद करण्यात आले. तेव्हा व्हॉईस रेकॉर्डर मध्ये असलेल्या मेमरी कार्ड मधील FOLDER-1 मध्ये फाईल क्रमांक 260210_1206 ही फाईल रेकॉर्ड झाली असल्याची दिसुन आली. आम्ही आरोपीस तक्रारदार यांचे कडुन स्विकारलेली लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी ती रक्कम त्यांचे सेतु सेवा केंद्राचे काऊटंरचे वर ठेवले असल्याचे सांगितल्याने आमचे सुचनेवरुन पंच क्रमांक २ श्री. कापगते यांनी आरोपी यांची अंगझडती घेतली असून त्यांचे अंगझडती मधुन मोबाईल फोन व ईतर साहीत्य मिळुण आल्याने त्याची अंगझडती यादी तयार करण्यात आली. तसेच काऊटंरचे वर ठेवली असलेली लाच रक्कम पंच क्रमांक २ यांचे हस्ते ताब्यात घेवून त्यांचे हस्ते मोजुन पाहीले असता त्यात ५००/-रुपयाचे २२ चलनी नोटा असे एकुण ११,०००/-रुपये असल्याचे दिसुन आले. त्या नोटा आरोपी यांचे सेतु सेवा केंद्राचे टेबलवर कोरे कागद ठेवून त्यावर पसरविण्यात आले. त्यानंतर सेतु सेवा केंद्राचा समोर असलेला शटर बंद करण्यात आला व विद्युत दिवे बंद करुन आरोपीच्या हातावर अल्ट्रावायलेट टार्चच्या प्रकाशात चेक केले असता आरोपी यांचे दोन्ही हातावर अॅन्थ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. टेबलवर पसरविण्यात आलेल्या नोटांवर सुध्दा टार्चच्या सहाय्याने प्रकाश टाकला असता नोटांवर सुध्दा अॅन्थ्रासिन पावडरची चकाकी दिसुन आली. त्यानंतर नोटांवरील क्रमांक प्रात्यक्षीक मधील नोटांचे क्रमांका सोबत जुळवुन पाहीले असता ते तंतोतंत जुळुन आल्याने ती लाच रक्कम असल्याची खात्री झाल्याने ते वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांचे सुध्दा हात अल्ट्रावायलेट दिव्याचे प्रकाशात चेक करण्यात आले.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष आरोपी श्री. सतिश मोटघरे यांना सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील कोणत्या साहेबांकरीता पैशाची मागणी केली आहे. याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले कि, ''माझे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील कोणत्याही साहेबा सोबत ओळखी नसून तक्रारदार हे माझेकडे डॉक्युमेंट मागण्याकरीता आल्यावर मी त्यांना सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील साहेबांसोबत फोनवर बोलणी करीत असल्याचा बनाव करुन मोबाईल नाहक कानाला लावून बोलणी करत होतो. असे सांगितले आहे. त्यानंतर आम्ही आरोपी श्री. सतिश मोटघरे यांचा पंचासमक्ष मोबाईल पाहणी केली असता, आरोपी यांचे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील कोणत्याही अधिकाऱ्यासोबत संपर्क झाल्याचे दिसून आले नाही.

(signature)
10/2/26
(नितेश ... देशमुख)
पो.नि. ACB भंडारा

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner

त्यानंतर आरोपी यास तक्रारदार यांचे स्वतःचे व त्यांचे मुलांचे ओरीजनल डॉक्युमेंट संबंधाने विचारणा केली असता, आरोपी यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे मुलांचे ओरीजनल डॉक्युमेंट हे माझे न्यु नेहा सेतु सेवा केंद्र येथील ड्राव्हर मध्ये असल्याचे सांगून ते ओरीजनल डॉक्युमेंट पंचासमक्ष सादर केले. सदरहू डॉक्युमेंट हे तक्रारदार यांचे मुलांचे शैक्षणीक व अत्यंत महत्वाचे असल्याने आरोपी कडून त्यांचे सेतु सेवा केंद्र येथून झेरॉक्स काढून आरोपी कडून वेगळया जप्तीपत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले असून मुळ डॉक्युमेंट तक्रारदार यांना परत करण्यात आले आहे.

त्यानंतर आरोपी यांना त्यांचे सेतु सेवा केंद्र चालविण्याबाबत कागदपत्रांची विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे सेतु सेवा केंद्र हे शासकीय कार्यालयात नोंदणीकृत नसल्याचे सांगून तो त्यांचे सेतु सेवा केंद्रामध्ये एस.बि. आय. ग्राहक सेवा केंद्र, ऑनलाईन फार्म भरणे, संगणक व संगणक पार्ट विक्रि करण्याचे काम करीत असल्याचे पंचासमक्ष सांगितले. तसेच त्याचेकडे सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथून शिष्यवृत्ती मिळवून देण्याचा परवाना नसल्याचे सांगितले. आरोपी यांचे एस.बि.आय. ग्राहक सेवा केंद्र (C.S.C.) चालविण्याचे कागदपत्रांच्या झेरॉक्त प्रती दोन्ही पंचासमक्ष वेगळया जप्तीपत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले आहे.

त्यानंतर आम्ही आरोपी व कार्यवाहीचे संपुर्ण साहीत्य व जप्ती मुद्देमाल सह पुढील कार्यवाही करिता पोलीस स्टेशन लाखणी येथे हजर येवून आरोपीस त्यांचे निवेदन लिहुन देणे करिता पेन, कागद उपलब्ध करुन दिला. त्यानंतर पंच क्रमांक ०१ श्री. निखील रामटेके यांचे कडुन सापळा कार्यवाही दरम्यान घडलेली हकिकत कथन करण्यास सांगितले असता, त्यांनी सांगितले कि, ''मी व तक्रारदार श्री. शंकर सावरकर असे मिळून आरोपी सतिश मोटघरे यांचे न्यु नेहा सेतु सेवा केंद्र येथे गेलो. तेव्हा आरोपीने तक्रारदारला पाहताच ''बोला'' असे बोलले त्यावर तक्रारदार यांनी ''कागद'' त्यावर आरोपीने ''डॉक्युमेंट्स पैसे'' असे बोलून तक्रारदार यांचे कडून लाच रक्कम स्विकारले. त्यानंतर तक्रारदार यांनी आरोपी यांनी लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित ईशारा केले असल्याचे सांगितले.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर मधील आज रोजी झालेले संभाषण रिवर्स फारवर्ड करुन ऐकले तसेच ते लॅपटॅपवर जोडणी करुन लागू संभाषणाची स्क्रिप्ट तयार केले. संभाषणाची स्क्रिप्ट व संभाषणाची फाईलची हॅश व्हॅल्यू काढुन ते मेमरी कार्ड वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करुन सीलबंद केले आहे. तसेच आरोपीचे मोबाईल फोनची पाहणी करुन वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करण्यात आले असुन जप्ती पत्रकावर आम्ही, पंच, आरोपी यांनी स्वाक्षरी केली आहे. कार्यवाहीचा पंचनामा तयार करण्यात आला असुन त्यात सविस्तर नोंदी घेण्यात आले आहेत.

तरी, तक्रारदार श्री. शंकर देवराव सावरकर, वय ५० वर्षे, रा. लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा हे नोंदणीकृत कामगार असून, त्यांचे मुलांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ येथून शिष्यवृत्ती मिळणे करीता ईतर लोकसेवक श्री. सतिश तुळशिराम मोटघरे, वय २८ वर्षे, ह.मु. लाखोरी रोड, लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा, मुळ पत्ताः- पोहरा, ता. लाखणी, जि. भंडारा यांचे न्यु नेहा सेतु सेवा केंद्र लाखणी येथून ऑनलाईन फार्म भरणा केले असून त्यावेळी आरोपी यांनी तक्रारदार यांचे व त्यांचे मुलांचे शैक्षणीक ओरीजनल डॉक्युमेंट सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथे जमा करावे लागतात असा बनाव करुन स्वतःकडे ठेवून ते डॉक्युमेंट परत देण्याकरीता तसेच शिष्यवृत्तीचे काम करुन दिल्याच्या मोबदल्यात तक्रारदार यांना सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, भंडारा येथील साहेब ओळखीचे असल्याचा प्रभाव पाडून १२,०००/- रुपये रक्कमेची मागणी करुन तडजोडी अंती ११,०००/- रुपये लाच रक्कम सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांचे कडून स्यिकारली आहे. म्हणून माझी ईतर लोकसेवक श्री. सतिश तुळशिराम मोटघरे, वय २८ वर्षे, ह.मु. लाखोरी रोड, लाखणी, ता. लाखणी, जि. भंडारा, मुळ पत्ताः- पोहरा, ता. लाखणी, जि. भंडारा, काम- न्यु नेहा सेतु सेवा केंद्र मालक तसेच ग्राहक सेवा केंद्र चालक यांचे विरुध्द कलम ७, ७(अ) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा सन २०१८) प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली सही.

NKHA
10/2/26
(अमितेश्वर कु. जेराकुल)
पो.नि. ACB भंडारा

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner